**कायम विना अनुदान तत्वावर परवानगी देण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक.नमाशा १००१/(४२/२००१)/माशि-१
शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -३२
दिनांक:- जून , २००३

प्रति,

**विभागीय शिक्षण उपसंचालक,**

**पुणे.**

**विषय:- सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षात नवीन माध्यमिक शाळांना कायम विना अनुदान तत्वावर परवानगी देण्याबाबत**

नवीन माध्यमिक शाळेस सुरु करण्यासाठी परवानगी मिळण्यासंदर्भात खालील तक्त्यातील नमूद केलेल्या वादी संस्थेने मा.उच्च न्यायालय , मुंबई येथे दाखल केलेल्या याचिका क्रमांक २५१५/२०००च्या संदर्भात वादी संस्थेस 'कायम विना अनुदान तत्वावर" नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवागनी देण्याबाबतचा निर्णय , वादी संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर माध्यमिक शाळा चालविण्यास तयार असल्याचे हमी पत्र देण्याच्या अटीवर शासन पत्र समक्रमांक दि. २४.९.२००१ अन्वये घेतलेला आहे. वादी संस्थेने शिक्षणाधिकारी (माध्य) ,जि.प., पुणे यांच्याकडे ' हमी पत्र "दिले असल्याने, वादी शैक्षणिक संस्थेला त्यांच्या नावासमोर दर्शनिविलेल्या ठिकाणी व माध्यमातून सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षापासून "कायम विना अनुदान तत्वावर" नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास या आदेशान्वये शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

| अनु.क्र. | संस्थेचे नाव | शाळेचे ठिकाण | माध्यम | इयत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | जय मल्हार शिक्षण संस्था, ढोकसांगवी ता. शिरुर जि. पुणे. | ढोकसांगवी ता. शिरुर जि. पुणे. | मराठी | आठवी |

२. सदर संस्थेना माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणा-या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास शासनाची परवानगी देण्यात येत आहे :-

(अ) या नवीन माध्यमिक शाळांना शासनाने विहित केलेल्या सूत्रानुसार अनुदान अनुज्ञेय राहिल.

(ब) सदर माध्यमिक शाळेस शासनाच्या वेळोवेळी निघणा-या आदेशांचे माध्यमिक शाळा संहिता महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

(क) सदर संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

३. ही परवानगी देण्यापूर्वी सदर संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची पूर्तता केल्याची खात्री करुन संबंधित नवीन माध्यमिक शाळेची मान्यता देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी:-

(१) संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.

(२) संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

(३) सदर संस्थेने चालविलेल्या शाळापैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

(४) संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

(५) सदर संस्थेमार्फत शाळा सुरु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही.

४. विहित शर्तीची व अटींची पूर्तता केल्याची काटेकोरपणे पडताळणी केल्यानंतरच माध्यमिक शाळांना मान्यता दिली जाईल अशी दक्षता विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी घ्यावी.

५. याबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. तसेच सदर माध्यमिक शाळेस परवानगी देण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करुन, त्याबाबतचा अहवाल शासनास त्वरीत पाठविण्यात यावा.

( भि.य. मंता )
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत, माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना.

१. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे.
३. मा.शालेय शिक्षणमंत्री यांचे खाजगी सचिव
४. मा.शालेय शिक्षण राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५. निवडनस्ती माशि-१